29 DEC 2023 पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठात 'अन्वेषण' महोत्सवास प्रारंभ

## पाच राज्यांतील ११ विद्यापीठांतून ६४ प्रकल्पांचा समावेश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी दोन दिवसीय पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ 'अन्वेषण' विद्यार्थी संशोधन महोत्सव-२०२३ ला उत्साहात प्रारंभ झाला. भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसंचालक तथा संशोधन विभागाचे प्रमुख व 'अन्वेषण'चे निमंत्रक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, एआययूच्या सहाय्यक संचालक डॉ. उषा राय नेगी यांच्या प्रमुख उपस्थितीत महोत्सवाचे उद्घाटन झाले.

भारतीय विद्यापीठ महासंघ, शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात या महोत्सवाचे आयोजन केले आहे. महोत्सवात मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व संलग्न क्षेत्रे, आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे, सामाजिक विज्ञान, मानव्यशास्त्रे, वाणिज्य, व्यावसायिक व्यवस्थापन आणि विधी या विविध क्षेत्रांतर्गत संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले. त्यामध्ये बायोसेन्सर्स, ऑटोमेटेड कापणीयंत्रे, जिव्हास्पर्शावर चालणारी खुर्ची, अत्याधुनिक तंत्राधारित कांदाचाळ, आधुनिक एअरो-सेल, औषधे पुरविणारे फार्मा एटीएम, पाईपलाईनमधील बिघाड शोधणारे उपकरण, विजेचे प्रिपेड मीटर, वीज चोरी ओळखणारे थेफ्ट डिटेक्टर, एडव्हान्स्ड थिन फिल्म डिपॉझिशन, औषधी सुगंधी मेणबत्ती, अळंबीच्या साक्यापासून थ्री-डी प्रिंटींग, गवत व तंतूमुळांपासून भांडी निर्मिती, ऑटो कम्पोस्टेबल सॅनिटरी पॅड, ग्रामीण भागातील बालकांसाठी स्लीपिंग बॅग्ज, नाकाद्वारे मेंदूपर्यंत औषधवाही जेल, लिंगभेदविरहित ओष्ठशलाका यांसह शेतकऱ्यांसाठी निवृत्ती वेतन योजना अशा विविध लक्ष्यवेधी संशोधन प्रकल्प व पोस्टर्सचा समावेश आहे.

उद्घाटनानंतर कुलगुरू डॉ. शिर्के, डॉ. पाणी, डॉ. नेगी यांनी सर्व संशोधन मांडणीची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. कविता ओझा, डॉ. विजयकुमार कुंभार, डॉ. कबीर खराडे, डॉ. दत्तात्रय गायकवाड, डॉ. शंकर हंगीरगेकर, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. ऊर्मिला पोळ आदी उपस्थित होते.

पदवी स्तरापासून ते पीएचडी संशोधकांपर्यंतच्या अभिनव संकल्पनांवर आधारित संशोधन प्रकल्पांचा या महोत्सवामध्ये समावेश आहे. पश्चिम विभागामधील महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात व राजस्थान या पाच राज्यांतील ११ विद्यापीठांनी महोत्सवात सहभाग घेतला असून एकूण ६४ संशोधन प्रकल्प सादर केले आहेत. एकूण १०८ संशोधक विद्यार्थी सहभागी झाले असून त्यात विद्यार्थिनींची संख्या ४५ इतकी आहे. संघप्रमुख १९ असून विषयतज्ज्ञ १७ आहेत.

# गवताची भांडी अन् औषधी मेणबत्ती

## शिवाजी विद्यापीठात 'अन्वेषण' संशोधन महोत्सवाला प्रारंभ


सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : जिभेच्या स्पर्शावर चालणारी खुर्ची, गवत व तंतुमुळांपासून भांडी निर्मिती, स्वयंचलित कापणीयंत्रे, औषधे पुरविणारे फार्मा एटीएम, अशा विविध अभिनव स्वरूपातील संशोधन आज शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांना पाहायला मिळाले. निमित्त होते विद्यापीठातील 'अन्वेषण' संशोधन महोत्सवाचे. त्यामध्ये पाच राज्यांतील ११ विद्यापीठांतील १०८ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

या दोन दिवसीय पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ 'अन्वेषण' विद्यार्थी संशोधन महोत्सवाचे उद्‍घाटन भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसंचालक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, एआययूच्या सहायक संचालक डॉ. उषा राय नेगी प्रमुख उपस्थित होते.

भारतीय विद्यापीठ महासंघ, शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभागातर्फे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहातील या महोत्सवात पदवी ते पीएच. डी. संशोधकांपर्यंतच्या अभिनव संकल्पनांवर आधारित संशोधन प्रकल्पांचा या महोत्सवामध्ये समावेश आहे. त्यामध्ये बायोसेन्सर्स, अत्याधुनिक तंत्राधारित कांदाचाळ, आधुनिक एअरो-सेल, पाईपलाईनमधील बिघाड शोधणारे उपकरण, विजेचे प्रिपेड मीटर, वीज चोरी ओळखणारे थेफ्ट डिटेक्टर, एडव्हान्स्ड थिन फिल्म डिपॉझिशन, औषधी सुगंधी मेणबत्ती, अळंबीच्या साक्यापासून थ्री-डी प्रिंटिंग, ऑटो कम्पोस्टेबल सॅनिटरी पॅड, ग्रामीण भागातील बालकांसाठी स्लीपिंग बॅग्ज, नाकाद्वारे मेंदूपर्यंत औषधवाही जेल, लिंगभेदविरहित ओष्ठशलाका, शेतकऱ्यांसाठी निवृत्ती वेतन योजनेचा समावेश आहे.

उद्‍घाटनानंतर प्रमुख उपस्थितांनी संशोधन मांडणीची पाहणी केली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, महादेव देशमुख, कविता ओझा, विजयकुमार कुंभार, कबीर खराडे, दत्तात्रय गायकवाड, शंकर हंगीरगेकर, ऊर्मिला पोळ, प्रल्हाद माने उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ अन्वेषण-२०२३ संशोधन महोत्सवातील संशोधन प्रकल्पाची संशोधकांकडून माहिती घेताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसंचालक डॉ. अमरेंद्र पाणी, डॉ. उषा राय नेगी, कविता ओझा, तानाजी चौगुले आदी.

### विविध क्षेत्रांतील ६४ प्रकल्प

या महोत्सवात महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात, राजस्थानमधील ११ विद्यापीठांनी सहभाग घेतला. त्यांनी मूलभूत विज्ञान व उपयोजित विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषी व संलग्न क्षेत्रे, आरोग्य विज्ञान व संलग्न क्षेत्रे, सामाजिक विज्ञान, मानव्यशास्त्रे, वाणिज्य, व्यावसायिक व्यवस्थापन आणि विधी या विविध क्षेत्रांतर्गत एकूण ६४ संशोधन प्रकल्प सादर केले आहेत. महोत्सवात एकूण १०८ संशोधक विद्यार्थी सहभागी झाले असून, त्यात विद्यार्थिनींची संख्या ४५ आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ अन्वेषण संशोधन महोत्सवातील संशोधन प्रकल्पाची माहिती घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसंचालक डॉ. अमरेंद्र पाणी, डॉ. उषा राय नेगी, डॉ. कविता ओझा आदी.

# अन्वेषणमध्ये ६४ संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ 'अन्वेषण' विद्यार्थी संशोधन महोत्सवाला प्रारंभ झाला. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर ६४ संशोधन प्रकल्प सादर केले आहेत. भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसंचालक व 'अन्वेषण'चे निमंत्रक डॉ. अमरेंद्र पाणी यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, एआययूच्या सहाय्यक संचालक डॉ. उषा राय नेगी यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय विद्यापीठ महासंघ, शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात या महोत्सवाचे आयोजन केले आहे. पदवी स्तरापासून ते पीएचडी संशोधकांपर्यंतच्या अभिनव संकल्पनांवर आधारित संशोधन प्रकल्पांचा या महोत्सवामध्ये समावेश आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात व राजस्थान या पाच राज्यांतील ११ विद्यापीठांनी महोत्सवात सहभाग घेतला आहे..

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रातील ३९३ परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आजअखेर ३९३ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरु आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर



ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर आर्किटेक्चर, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, डिप्लोमा कोर्स इन जॅपनिज लँग्वेज, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग आदी १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये, अधिविभागामध्ये झाल्या. परीक्षेला २ हजार ३७३ विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी २६ विद्यार्थी गैरहजर होते. दि. २८ रोजी एम.ए. (हिंदी), पीजी डिप्लोमा इन इंटरॅनशनल रिलेशन, एमए (समाजशास्त्र) अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांचे ११ निकाल घोषित करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
लोकमत

# पंजाबराव देशमुख यांची जयंती

कोल्हापूर : महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती बुधवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी केली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. राजाराम गुरव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. दत्तात्रय गायकवाड, डॉ. वर्षा जाधव, डॉ. मनोज लेखक, डॉ. सावळीराम घाणे, डॉ. सचिन पाटील, अभिजित पार्टे, हर्षल व्हटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत विद्यार्थ्यांना नाट्यनिर्मितीचे धडे

कोल्हापूर : संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांना नाट्यनिर्मिती, सादरीकरण प्रक्रियेचे धडे मिळाले. कार्यशाळेसाठी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या परफार्मिंग आर्टस् विभागाचे वरिष्ठ सहायक प्रा. डॉ. सतीश पावडे यांनी विद्यार्थ्यांना नाट्यशास्त्रातील प्रक्षेपण व्यवस्था याविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये पहिल्या दिवशी नाट्य निवडताना त्याचे कथानक, पात्र, विषय, आशय, संरचना, घटनेचा काळ इत्यादी आवश्यक गोष्टींवर चर्चा झाली. दुसऱ्या दिवशी भरताचे नाट्यशास्त्र आणि त्याचे आजच्या काळात लागणारे संदर्भ यांची माहिती देण्यात आली. डॉ. निखिल भगत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय युवराज केळुसकर यांनी करून दिला. यावेळी डॉ. संजय तोडकर डॉ. अंजली निगवेकर, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
29 DEC 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बँकांच्या कार्यक्षमतेत वाढ हवी

## महादेव देशमुख : विद्यापीठात शाखा व्यवस्थापकांसाठी कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सहकार क्षेत्रातील नागरी सहकारी बँकांचे योगदान खेडोपाड्यापासून नागरी समूहापर्यंतच्या लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी उल्लेखनीय आहे, पण आजची बँकिंग क्षेत्रातली स्पर्धा पाहता नागरी सहकारी बँकांच्या कार्यक्षमतेत सर्वच बाजूंनी लक्षणीय वाढ होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी बुधवारी केले. विद्यापीठात आयोजित दोनदिवसीय मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया चेअर, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक सहकारी असोसिएशन यांच्यातर्फे नागरी सहकारी बँकांच्या शाखा व्यवस्थापकांसाठी मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राम आयोजित करण्यात आला.

बँक ऑफ इंडिया चेअरचे प्राध्यापक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. कुंभी कासारी सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रेय राऊत यांनी आरबीआय गाईडलाईन्स व डिपॉझिट्सचे महत्त्व तसेच ॲप्राईजल ऑफ लोन प्रोपोजलबद्दल माहिती दिली. पंचगंगा नागरी सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक फडणीस यांनीही मार्गदर्शन केले. कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शिरगावे यांनी ऑडिट्सचे विविध प्रकार आणि शाखेचा व्यवसाय कसा वृद्धिंगत करावा, याबद्दल माहिती दिली.

सायबर कॉलेजच्या कौन्सिलर ऊर्मिला चव्हाण यांनी ब्रांच सांभाळत असताना मोटिवेशनचे महत्त्व आणि संवाद कौशल्य याविषयी अवगत केले.

# नागरी बँकांच्या कार्यक्षमतेत सर्वांगीण वाढ आवश्यक : डॉ. महादेव देशमुख

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सहकार क्षेत्रातील नागरी सहकारी बँकांचे योगदान खेडोपाड्यांपासून नागरी समूहापर्यंतच्या लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी उल्लेखनीय आहे. परंतु, आजची बँकिंग क्षेत्रातली स्पर्धा पाहता नागरी सहकारी बँकांच्या कार्यक्षमतेमध्ये सर्वच बाजूंनी लक्षणीय वाढ होणे गरजेचे आहे. असे झाले तरच नागरी सहकारी बँका समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी अधिक उत्तुंग काम करू शकतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित दोन दिवसीय मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. मॉडर्न मॅनेजरियल अ‍ॅप्रोच या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. कुंभी कासारी सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय राऊत यांनी आरबीआयच्या मार्गदर्शक सूचना व डिपॉझिट्सचे महत्त्व याबद्दल माहिती दिली. पंचगंगा नागरी सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक फडणीस यांनी ब्रांच मॅनेजरच्या जबाबदाऱ्या व व्यवस्थापकीय मंडळाकडून त्यांच्याकडून असलेल्या अपेक्षा, कस्टमर सर्व्हिस याबद्दल मार्गदर्शन केले.

कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शिरगावे, सायबर कॉलेजच्या कौन्सिलर उर्मिला चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँकांच्या असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले. बँक ऑफ इंडिया चेअरचे प्रा. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
पुढारी

# पीएच. डी. प्रवेश परीक्षा कार्यशाळा नोंदणीसाठी आवाहन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने ऑनलाईन पीएच. डी. प्रवेश परीक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. विद्यापीठातर्फे पीएच.डी प्रवेश २०२३-२४ च्या प्रक्रियेसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज १० जानेवारीपर्यंत मागविण्यात आले आहेत. याबाबत पीएच.डी. प्रवेश परीक्षा तयारी कार्यशाळा दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे विद्यार्थ्यांसाठी जानेवारी २०२४ मध्ये आयोजित केली जाणार आहे.

कार्यशाळा दोन भागात असणार आहे. या कार्यशाळेत मान्यवर प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
लोकमत

# संगीत विभागात कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्यावतीने दोनदिवसीय नाट्य कार्यशाळा उत्साहात पार पडली. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील वरिष्ठ सहायक प्राध्यापक डॉ. सतीश पावडे यांनी विद्यार्थ्यांना नाट्य निर्मिती आणि सादरीकरणाची प्रक्रिया यावर मार्गदर्शन केले.

या दोनदिवसीय कार्यशाळेमध्ये पहिल्या दिवशी नाट्य निवडताना त्याचे कथानक, पात्र, विषय, आशय, संरचना, धटनेचे कार्य यावर चर्चा केली. दुसऱ्या दिवशी भरत यांचे नाट्यशास्त्र आणि त्याचे आजच्या काळात लागणारे संदर्भ यांची माहिती देण्यात आली. डॉ. निखिल भगत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विनोद ठाकूर देसाई यांनी स्वागत केले. युवराज केळुसकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी डॉ. संजय तोडकर, डॉ. अंजली निगवेकर व विभागातील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
पुढारी

# मागील वर्षापासूनच एम.फिल.चे प्रवेश बंद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) मास्टर ऑफ फिलॉसॉफी (एम.फिल.) पदवी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात २०२२ पासून एम.फिल.ला प्रवेश बंद केल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

**प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची माहिती**

यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी एम.फिल. बंद करण्यासंदर्भात परिपत्रक जारी केले आहे. यापूर्वीच ७ नोव्हेंबर २०२२ रोजी यूजीसीने एम.फिल., पीएच.डी.संदर्भात देशभरातील सर्व विद्यापीठांना ड्राफ्ट पाठविला आहे. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून २०२२-२३ पासून एम.फिल.ला प्रवेश देण्याचे बंद केले आहे. २०२२ पूर्वी प्रवेश घेतलेल्या सुमारे ७० हून अधिक विद्यार्थ्यांचे एम.फिल. पूर्ण होईल, असेही प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 DEC 2023
पुढारी

# अ. भा. आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत विद्यापीठ संघास सुवर्णपदक

कोल्हापूर : सुरेश ज्ञानविहार विद्यापीठ जयपूर, राजस्थान येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघाने सुवर्णपदक पटकावले. दोन्ही संघांची गुवाहाटी आसाम विद्यापीठ खेलो इंडियासाठी निवड झाली आहे. विजयी महिला संघात वैष्णवी मोरे, अस्मिता मांढरे, समीक्षा गावडे, प्राजक्ता गावडे, निशा मोळके, पल्लवी मोरे यांचा समावेश आहे. दर्शन मिणियार, शुभम लगड, कुनाल दरवान, ओंकार कबुले यांचा पुरुष संघात समावेश आहे. संघ प्रशिक्षक बापूसाहेब समलेवाले, संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. राहुल मगदूम काम पाहत आहेत. खेळाडूंना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.